माहितीचा
अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
# बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

## रामाआ- तक्रार क्र. बीएम- १४४/२०२०

**तक्रारकर्ता श्री. सुमीर सबरवाल**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा नियुक्त अधिकारी-३ (एच/पश्चिम)**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त एच/पश्चिम विभाग यांचे कार्यालय,
२ री हसनाबाद लेन, खार (पश्चिम) मुंबई -४०० ०५२.

**प्रथम अपिलीय अधिकारी**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त एच/पश्चिम विभाग यांचे कार्यालय,
२ री हसनाबाद लेन, खार (पश्चिम) मुंबई -४०० ०५२.

**<u>तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : १३.१०.२०२५</u>**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित(प्रतिनिधी) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र. मु.मा.आ. ३४८३/२०१८ रा.मा.आ. अपील क्र. १४२३/२०१९ प्रकरणी आयोगाने दि. १८.१२.२०१९ रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

*"जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीना उपलब्ध माहिती १५ दिवसामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७(६) अन्वये निशुल्क द्यावी. या आदेशासह अपील निकाली काढण्यात येत आहे."*

उक्त आदेशानुषंगाने तक्रारकर्ता यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी दि. १७.०२.२०२० रोजी आयोगासमोर तक्रार अर्ज दाखल केला. सदर तक्रारीवर जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक कायदा अधिकारी (एच/पश्चिम), बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त एच/ पश्चिम विभाग यांचे कार्यालय, बांद्रा (पश्चिम), मुंबई यांच्याकडून आयोगाने दि. ०४.०३.२०२० व दि. ३१.१२.२०२० रोजीच्या पत्रानुसार अहवाल मागविण्यात आला. त्याअनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक कायदा अधिकारी (एच/पश्चिम), बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त एच/ पश्चिम विभाग यांचे कार्यालय, बांद्रा (पश्चिम), मुंबई आयोगास अहवाल अप्राप्त आहे.

सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता यांचे प्रतिनिधी व जन माहिती अधिकारी उपस्थित असून तक्रारकर्ता यांनी त्यांचे लेखी निवेदन आयोगासमोर सादर केले. ते अभिलेखावर घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, तक्रारकर्ता यांनी मागील ३ वर्षात २५० पेक्षा जास्त माहिती अर्ज सादर करुन माहिती प्राप्त करुन घेतलेली आहे. तसेच, त्यांचे अभिलेखावरुन स्पष्ट होत नाही की, आज रोजीच्या तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारकर्ता यांना राज्य माहिती आयोग यांचे दि.१८.१२.२०१९

..२/-

रोजीच्या आदेशानंतर माहिती दिली होती किंवा नाही. जन माहिती अधिकारी यांनी सदर बाब आयोगासमोर सादर करण्यासाठी वेळेची मागणी केली. त्यांची मागणी मान्य करण्यात येत आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. ०४.११.२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission
सत्यमेव जयते
Greater Mumbai

प्रदीप व्यास
14-10-2025

**मुंबई**
**दिनांक : १४.१०.२०२५**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

राज्य माहिती आयुक्त बृहन्मुंबई